	M. S. Board Of Secondary And Higher Secondary Education, Mumbai Divisional Board, Vashi, Navi Mumbai-400 703.		महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ, वाशी,नवी मुंबई-४०० ७०३.	स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्र.मुंविमं/यो.प्र./ २७७८
वाशी, नवी मुंबई
दिनांक :२७/०५/२०२५

प्रति,

प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये

विषय :- सन २०२४-२०२५ इ.११ वी विद्यार्थ्यांची योग्यता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, ज्या कनिष्ठ महाविद्यालयांनी सन २०२४-२०२५ करिता इ. ११ वी विद्यार्थ्यांच्या योग्यता प्रमाणपत्र करिता अर्ज सादर केले होते, अशा पात्र विद्यार्थ्यांची योग्यता प्रमाणपत्रे आपल्या प्रतिनिधीस अधिकार पत्रासह मंडळ कार्यालयात **रुम नं.१०९** येथे सकाळी ११.०० ते ५.०० या वेळेत पाठवून घेऊन जाण्याची व्यवस्था करण्यात यावी.

<u>योग्यता प्रमाणपत्राचे पाकिट स्विकारताना खालील सुचनांचे काटेकोर पणे पालन करण्यात यावे.</u>

१) पाकिट स्विकारताना ते आपल्याच कनिष्ठ महाविद्यालयाचे आहे याची खातरजमा करण्यात यावी.
२) आपल्या कनिष्ठ महाविद्यालया मार्फत सादर केलेल्या सर्व विद्यार्थ्यांची योग्यता प्रमाणपत्रे पाकिटात आहेत का ? याची पडताळणी करुन अप्राप्त प्रमाणपत्रांबाबत मंडळाशी त्वरित पत्र व्यवहार करण्यात यावा.
३) आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या पाकिटात चुकून अन्य कनिष्ठ महाविद्यालयाचे योग्यता प्रमाणपत्र आढळल्यास त्वरित योग्यता प्रमाणपत्र शाखेत जमा करण्यात यावे.
४) ज्या विद्यार्थ्यांच्या योग्यता प्रमाणपत्र अर्जातील त्रुटीची पूर्तता अद्यापपर्यंत कनिष्ठ महाविद्यालया मार्फत करण्यात आलेले नाहीत,अशा विद्यार्थ्यांची योग्यता प्रमाणपत्रे मंडळा मार्फत रोखून ठेवण्यात आलेली आहेत याची संबंधितानी नोंद घेऊन त्रुटीपूर्तता त्वरित करण्यात यावी.
५) परराज्यातून /परदेशातून /अन्य बोर्डातून इ.१० वी उत्तीर्ण होऊन आपले कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या ज्या विद्यार्थ्यांचे योग्यता प्रमाणपत्र प्रस्ताव अद्यापपर्यंत सादर केलेले नाहीत अशा विद्यार्थ्यांचे प्रस्ताव त्वरित सादर करण्यात यावेत.

(ज्योत्स्ना शिंदे–पवार)
(प्र.)विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ,वाशी
नवी मुंबई - ४०० ७०३.